N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** चंद्रपुर  **P.S.(ठाणे):** चिमुर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0329  **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 13/09/2023 05:20

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन  **Date From (दिनांक पासून):** 05/09/2023

**Time Period (कालावधी):**  **Date To ( दिनांक पर्यंत):** 12/09/2023

**Time From (वेळेपासून):** 16:40 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 17:25 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 12/09/2023  **Time (वेळ):** 20:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 008

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 13/09/2023 04:53 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 02 किमी  **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** ताडोबा बार चिमुर,चिमुर, 442903

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

# फिर्याद

कॅम्प:—पोलीस स्टेशन,चिमुर
जि. चंद्रपुर
दिनांक १३/०९/२०२३

मी श्री. राजेन्द्र तुळशीराम मेश्राम, वय ४२ वर्षे, व्यवसाय— ठेकेदारी रा. फ्लॅट क्र. १०७, जिंदल कॉम्प्लेक्स, जोगीठाणा बस स्टॉप जवळ, उमरेड ता. उमरेड जि. नागपूर ९५५२०००६७१, ९४२०५६५१५७

मी वर नमुद पत्यावर राहत असुन, दिनांक २२.०८.२०२३ रोजी पोलीस निरीक्षक श्रीमती वर्षा मते, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर यांचे समक्ष एका लोकसेवकाविरूध्द लाच मागणी संबंधाने माझी लेखी तक्रार नोंदविली व तक्रारीवर मी स्वाक्षरी केली. माझी लेखी तक्रार पुढीलप्रमाणे—

'मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नागपूर येथे येवुन तक्रार देतो की, मी उमरेड येथे राहतो. माझी पत्नी सौ. सपना राजेंद्र मेश्राम ही सिव्हील इंजीनियर असुन तिच्याकडे सार्वजनिक बांधकाम विभाग जिल्हा परिषद, नागपूर येथील कंत्राटदाराचे नोंदणी प्रमाणपत्र क्रमांक ६२२/२०/नोंदणी/२०२०—२१/दि. १०/१२/२०२० असे ०५ वर्षाकरीता आहे. त्या प्रमाणपत्राचे आधारे शासनाकडुन करण्यात येणारे बांधकामाचे कंत्राट तिला प्राप्त करता येतात. प्राप्त झालेल्या टेंडरनुसार बांधकाम मटेरीयल पुरवठा करण्याचे काम मी व माझी पत्नी असे आम्ही दोघेही मिळुन करीत असतो. काही दुरच्या ठिकाणी माझे पत्नीला जाणे शक्य होत नसल्याने मी त्या ठिकाणी स्वत: जावुन कामावर देखरेख ठेवत असतो. त्याबाबत माझ्या पत्नीने मला अधिकारपत्र लिहुन दिलेले आहे.

अंदाजे ऑगस्ट—सप्टेंबर २०२२ मध्ये ग्राम पंचायत, आंबेनेरी ता. चिमुर जि. चंद्रपुर अंतर्गत विविध कामाचे बांधकाम करण्याकरिता ऑनलाईन टेंडर निघाले होते. त्याकरीता मटेरीयल पुरविण्याबाबतचे ऑनलाईन कोटेशन मागविण्यात आले होते. माझी पत्नी सौ. सपना मेश्राम हिच्या कडे कंत्राटदाराचे नोंदणी प्रमाणपत्र असल्याने तिने मटेरीयलचे ऑनलाईन कोटेशन भरले होते. सदर टेंडर मध्ये माझे पत्नीने टाकलेले कोटेशन कमी दराचे असल्याने ग्राम पंचायत, आंबेनेरी ता. चिमुर जि. चंद्रपुर येथील मटेरियल पुरवठा टेंडर एक वर्षा करीता तिला प्राप्त झाले होते. ग्राम पंचायत आंबेनेरी ता. चिमुर जि. चंद्रपुर येथील जिल्हा परिषद शाळा, आंबेनेरी येथे सिमेंट, गट्टु, डस्ट, बोल्डर, रेती, बारीक गिट्टी हे मटेरीयल पुरविले होते. सदरचे काम २७ जानेवारी २०२३ रोजी पुर्ण झाले आहे.

सदर कामाचे देयके जुलै २०२३ ला ग्राम पंचायत, आंबेनेरी येथे जमा झाल्याचे मला समजले म्हणुन मी दिनांक २९/०७/२०२३ रोजी ग्राम पंचायत, आंबेनेरी येथील ग्रामसेवक श्री. राजेश कामडे यांना त्यांचे मोबाईल क्र.९४०५१३७६८६ वर फोन केला असता, ते सुटीवर असल्याचे समजले. म्हणुन मी आंबेनेरीचे सरपंच श्री. संदीप दोडके यांना दिनांक ०१/०८/२०२३ रोजी त्यांचे मोबाईल क्र ७२२००३११६५ वर माझे मोबाईल क्र.९५५२०००६७१ वरून माझ्या कामाचे पैशाबाबत विचारणा केली असता, त्यांनी फोनवर माझेशी बोलण्यास टाळाटाळ केली म्हणुन मी दिनांक ०२/०८/२०२३ रोजी माझे पत्नीसह ग्राम पंचायत, आंबेनेरी येथे गेलो व ग्रामसेवक श्री. कामडे यांना भेटलो असता त्यांनी माझे कामाचे एकुण १५,७२,०००/— च्या चेकवर सहया केल्या असुन सरपंच श्री. संदीप दोडके यांच्या सहया बाकी आहेत असे सांगीतले. तेव्हा मी सरपंच श्री. दोडके यांना त्यांचे सभाकक्षात जावुन भेटलो असता, त्या ठिकाणी सरपंच श्री. दोडके तसेच ग्रामपंचायत कार्यालयातील कर्मचारी श्री. ठवरे व ग्रामपंचायत सदस्य श्रीमती

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): राजेद्र तुळशीराम मेश्राम

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1981

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | फ्लॅट न 107 जिंदल कॉम्प्लेक्स ,जोगी ठाणा बस स्टाप जवळ उमरेङ , उमरेङ,उमरेड,नागपुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | फ्लॅट न 107 जिंदल कॉम्प्लेक्स ,जोगी ठाणा बस स्टाप जवळ उमरेङ , उमरेङ,उमरेड,नागपुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9552000671

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | संदिप सुखदेव दोळके | | वडील का नाम : सुखदेव दोळके | 1. महाविर मंदिराजवळ,आंबेनेरी, चिमुर,भिसी,चंद्रपुर,महाराष्ट्र, भारत |
| 2 | रामदास परसराम चौधरी | | वडील का नाम : परसराम चौधरी | 1. बोरगाव बुट्टी,चिमुर,भिसी,चंद्रपुर, महाराष्ट्र,भारत |
| 3 | हरीश अंबादास गायकवाङ | | वडील का नाम : अंबादास गायकवाङ | 1. आंबेनेरी,चिमुर,भिसी,चंद्रपुर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

शंभरकर हे हजर होते. सरपंच श्री. दोडके यांनी आम्ही केलेल्या कामाचे १४,२६,००३/— रुपयांचे वेगवेगळया ८ चेक वर सहया करुन माझी पत्नी सौ. सपना मेश्राम हिचे कडे दिले व उर्वरीत रुपये १,१३,९२३/— चे चेकवर सहया करुन चेक दिले नाही. माझ्या पत्नीने व मी सरपंच श्री. दोडके यांना उर्वरीत रकमेबाबत विचारणा केली असता, त्यांनी मला बाजुला बोलावुन हळुच म्हटले की, तुमच्या एकुण १५,७२,०००/—रू बिलापैकी ५ टक्के रक्कम म्हणजे ७८,६००/— रू मला पाहीजे असे म्हणुन लाचेची मागणी केली. त्यानंतर मी माझ्या पत्नीला सरपंचाने केलेल्या लाचेच्या मागणी विषयी सांगितले असता तिने लाच देण्यास नकार दर्शविला.

त्यानंतर आज सकाळी ०९.०० वा. चे सुमारास मी सरपच श्री. संदीप दोडके यांना फोन द्वारे संपर्क करुन माझे उर्वरीत चेकबाबत विचारपुस केली असता, त्यांनी मला मी फोन करेल त्यावेळी तुम्ही मला प्रत्यक्ष येवुन भेटा असे फोनवर सांगीतले.

सरपंच श्री. संदीप दोडके यांना लाच घेतल्याशिवाय माझे उर्वरीत रुपये १,१३,९२३/— चे चेकवर सहया करून देण्याची शक्यता दिसून येत नसल्याने मी माझ्या पत्नीसोबत याबाबत चर्चा केली. मी व माझी पत्नी सौ. सपना मेश्राम हिला ग्राम पंचायत, आंबेनेरी ता. चिमुर येथील सरपंच श्री. संदीप दोडके यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने मी माझ्या पत्नीचे सहमतीने स्वत: लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर येथे येवुन तक्रार देत आहे. तसेच माझे व माझे पत्नीचे श्री. संदीप दोडके सरपंच ग्रामपंचायत आंबेनेरी ता. चिमुर यांचेशी कोणतेही पुर्व वैमनस्य नसुन त्यांचेसोबत कोणतेही वैयक्तीक आर्थीक देवाण—घेवाण बाबतचे व्यवहार नाहीत.

माझे कडे लाच रकमेत देण्याकरिता ७८,६००/— रुपये उपलब्ध नसल्याने मी कार्यवाही करीता माझे वैयक्तीक बचतीमधील रुपये ५०,०००/— तसेच माझे व माझे पत्नीचे ओळखपत्र, पत्नीचे कंत्राटदाराचे नोंदणी प्रमाणपत्र, पत्नी सौ. सपना हिचे अधिकारपत्र, वाहनाचे आर. सी, बॅक ऑफ इंडिया शाखा, उमरेड येथील खाते क्र. ८७६१२०११०००००२८७ चे बॅक स्टेटमेन्ट, आठ चेक बॅकेत जमा केल्याबाबतच्या बॅक ऑफ इंडिया, उमरेड येथील पावत्या, मटेरीयल टेंडर ग्राम पंचायत आंबेनेरीची झेरॉक्स प्रत सादर करीत आहे. गैरअर्जदार श्री. संदीप दोडके सरपंच ग्राम पंचायत आंबेनेरी हे माझे उर्वरीत बिलाचे धनादेशावर सही करण्याकरिता लाचेची मागणी करीत असल्याने त्यांचे विरुध्द माझी तक्रार आहे.'

अशी तक्रार दिल्यानंतर पोलीस निरीक्षक वर्षा मते यांनी मुख्य अधिकारी, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, नागपूर यांना पत्र देवुन शासकीय पंच क्र. १ शरद बाळासाहेब दातखिळे तसेच पंच क्र. २. श्री. आकाश पंडीत परोडवाड या दोन शासकीय पंचांना पाचारण करून, मला त्यांची ओळख करून दिली. पोलीस निरीक्षक वर्षा मते यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकीकत सांगुन, मी दिलेली लेखी तक्रार पंचांना वाचण्यास दिली. त्यानंतर पोलीस निरीक्षक वर्षा मते यांचे सुचनेवरून सदरच्या तक्रारीवर दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली व तद्नंतर पोलीस निरीक्षक वर्षा मते यांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर मला सापळा अधिकारी यांनी सापळा कार्यवाही करीता माझेकडे असलेले रुपये ५०,०००/— ज्यात (रू. ५००/— दराच्या १०० चलनी नोटा) पोलीस निरीक्षक वर्षा मते यांचेकडे कार्यवाहीकरीता जमा केले. सदर नोटांना अँथ्रासीन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन, तद्नंतर लाचेच्या रकमेस अँथ्रासीन पावडर लावून त्यांचे गुणधर्म व प्रात्यक्षिक करून दाखविले. तसेच सोनी कंपनीचा व्हॉईस रेकॉर्डर दाखवुन तो कशा प्रकारे काम करतो, याबाबत शासकीय पंचांना व मला सविस्तर माहिती दिली. त्यानंतर पोलीस निरीक्षक वर्षा मते यांनी मला गैरअर्जदार हे त्यांचे कार्यालयात केव्हा मिळुन येतील? याबाबत विचारणा केली असता, मी त्यांना सांगीतले की, गैरअर्जदार यांनी मी फोन करेल तेव्हा या असे सांगीतल्याने, गैरअर्जदार यांचा मला फोन आल्यानंतर पुढील सापळा पडताळणी कार्यवाही करण्यात येईल असे सर्वानुमते ठरविण्यात आले. सविस्तर नोंदी प्रात्यक्षिक पंचनामा क्र. १ मध्ये घेण्यात आल्या.

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रु दराच्या 82 चलनी नोटा | 41,000.00 |
| 2 | इतर | यंत्र-उपकरण/उपसाधन | sandisc कंम्पनीचे 32 GB क्षमतेचे 02 मेमरी कार्ड | 0.00 |
| 3 | इतर | घरगुती वस्तु | एक निळ्या रंगाचा उभ्या रेशा असलेला ईलोसे क्र 01याचा फुलपँट | 0.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

41,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

हकीकत याप्रमाने आहे की वरील घटना ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी क्र 01) श्री संदिप सुखदेव दोळके वय 30 वर्ष पद सरपंच ग्रमपंचायत आंबेनेरी ता चिमुर जि चंद्रपुर 02) श्री रामदास परसराम चौधरी वय 39 वर्ष पद सरपंच गटग्रामपंचायत बोरगाव बुट्टी ता चिमुर जि चंद्रपुर 03) श्री हरीश अंबादास गायकवाड वय 45 वर्ष पद उपसरपंच ग्रामपंचायत आंबेनेरी ता चिमुर जि चंद्रपुर यांनी आपल्या पदाचा गैरवापर करुन पंचासमक्ष तक्रारदार यांनी ग्रांमपंचायत आंबेनेरी अंतर्गत जिल्हा परीषद आंबेनेरी येथे पुरविलेल्या बाधकांम मटेरियलचे प्राप्त बिलाचे धनादेशावर सही करुन देन्याकरीता दि 05/09/023रोजी लाच रकमेची मागणी करुन दि 12/09/023 रोजी आरोपी क्र 01) संदिप सुखदेव दोळके यांनी लाच रक्कम 41,000 रु पंचासमक्ष ताळोबा चिमुर येथे स्विकारली तक्रारदार यांची लेखी फिर्याद वरुन सदरचा गुन्हा नोंद करुन तपासात घेतला

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
bhishamraj suresh sorate
**Rank** (पद): SI (Sub-Inspector) **No.**(क्र.): 1490600362jubm
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

त्यानंतर मी दिनांक २९/०८/२०२३ रोजी माझे कामानिमीत्त ग्राम पंचायत, आंबेनेरी ता. चिमुर जि.चंद्रपुर येथे गेलो असता, गैरअर्जदार यांनी मला दिनांक ३०/०८/२०२३ रोजी उमरेड येथे येवुन भेटतो असे सांगीतले. त्यावरुन मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर येथे जावुन सदर माहीती पोलीस निरीक्षक वर्षा मते यांना दिली. पोलीस निरीक्षक वर्षा मते यांनी दोन्ही पंचांना तसेच सापळा पथकास बोलावुन सापळा कार्यवाही दिनांक ३०/०८/२०२३ रोजी उमरेड येथुन करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. ठरल्याप्रमाणे दिनांक ३०/०८/२०२३ रोजी पोलीस निरीक्षक वर्षा मते व सापळा पथक तसेच दोन्ही पंच हे सापळा पडताळणी करीता उमरेड येथे येवुन मला भेटले. आम्ही बराच वेळ गैरअर्जदार यांचे फोनची तसेच मॅसेजची वाट पाहुन सुध्दा गैरअर्जदार यांचा मला फोन किंवा मॅसेज न आल्याने कार्यवाही तात्पुरती स्थगीत ठेवुन गैरअर्जदार यांचा मला फोन आल्यावर कार्यवाही करण्यात येईल असे सर्वानुमते ठरविण्यात आले. सविस्तर नोंदी पडताळणी पंचनामा क्र. २ मध्ये घेण्यात आल्या आहेत.

त्यानंतर दिनांक ०४/०९/२०२३ रोजी मला गैरअर्जदार संदीप दोडके यांनी फोनद्वारे कळविले की, मी उद्या दिनांक ०५/०९/२०२३ रोजी तुमच्या उमरेड येथील कार्यालयात येवुन भेटतो असे सांगीतल्याने मी फोनद्वारे पोलीस निरीक्षक वर्षा मते यांना कळविले तेव्हा त्यांनी आम्ही सापळा पथक व पंचासह उमरेड येथे येवुन सापळा पडताळणी कार्यवाही दिनांक ०५/०९/२०२३ रोजी उमरेड येथुन करण्यात येईल असे सांगीतले. ठरल्याप्रमाणे दिनांक ०५/०९/२०२३ रोजी सापळा पथक व दोन्ही पंच हे मला ११.४५ वाजता मांगरुळ फाटा येथे येवुन भेटले तेथे आम्ही बराच वेळ गैरअर्जदार यांची वाट पाहुन सुध्दा गैरअर्जदार हे हजर न आल्याने मी माझे मोबाईल क्र. ९५५२०००६७१ यावरुन गैरअर्जदार श्री. संदीप दोडके यांचे मोबाईल क्र. ७२२००३११६५ यावर फोन केला असता गैरअर्जदार यांनी फोन उचलला नाही. काही वेळानंतर गैरअर्जदार यांनी माझा मोबाईल क्र. ९५५२०००६७१ यावर फोन करुन सांगीतले की, मी उमरेड येथे येत आहे तुमचे कार्यालयात येवुन भेटतो. असे गैरअर्जदार यांनी फोनवर सांगताच पोलीस निरीक्षक वर्षा मते यांनी सापळा पडताळणी माझे उमरेड येथील कार्यालयातुन करण्याचे ठरविले. त्यानंतर माझी सापळा पडताळणी पुर्वीची अंगझडती पंच क्र. १ श्री. दातखिळे यांचे हस्ते घेण्यात आली. यानंतर 'सोनी'' कंपनीच्या बनावटीचे आय.सी.डी.–यु.एक्स.५३३.एफ या मॉडेलचे व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नविन सिलबंद पॅकेट मधून सॅनडीस्क कंपनीचे ३२ जिबी मेमोरी असलेले कार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर पंच क्र. १ श्री. दातखिळे यांचे आवाजात सुरु करुन, सदरचे व्हाईस रेकॉर्डर माझे गळयात धाग्याचे सहायाने लटकावुन मी परिधान केलेल्या शर्टाचे आत लपवुन ठेवण्यात आले व वेळ १५.०६ वा मांगरुळ फाटा येथुन माझे चारचाकी वाहनाने पंच क्र. १ श्री. दातखिळे यांचे सोबत पडताळणी करिता रवाना केले. मी व पंच क्र. १ श्री. दातखिळे असे आम्ही माझे नगर परिषद, उमरेड येथील कॉम्प्लेक्स मधील कार्यालयात गेलो. तेथे काही वेळ वाट पाहुन सुध्दा गैरअर्जदार हे माझे कार्यालयात न आल्याने मी त्यांना फोन केला असता गैरअर्जदार यांनी थोडयाच वेळात येत असल्याचे सांगीतले. थोडया वेळानंतर गैरअर्जदार श्री. संदीप दोडके सरपंच ग्रामपंचायत आंबेनेरी व त्याचे सोबत शेजारचे गाव बोरगांव (बुट्टी) येथील सरपंच श्री. रामदास चौधरी हे माझे कार्यालयात आले. त्यांनी माझेसोबत आंबेनेरी येथील केलेल्या कामाबाबत बोलुन त्यादरम्यान मला एकुण बिलापैकी सरपंच व ग्राम पंचायत सदस्य यांचे मिळुन ५ टक्के व केवळ सरपंच यांचे ३ टक्के अशी पंच क्र. १ श्री. दातखिळे यांचे समक्ष लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली व तुम्ही या असे म्हणुन दोन्ही गैरअर्जदार माझे कार्यालयातुन निघुन गेले. त्यानंतर मी व पंच क्र. १ असे आम्ही पोलीस निरीक्षक वर्षा मते व सापळा पार्टी थांबुन असलेल्या ठिकाणी परत येवून पंच क्र. १ यांच्या आवाजात व्हाईस रेकॉर्डर १६.४० वाजता बंद केला त्यानंतर माझी पंच क्र. १ यांचे हस्ते अंगझडती घेण्यात आली.

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): manoj changorao ga
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

स्टे.डा.अमलदार
पो.स्टे. चिमूर

त्यानंतर पोलीस निरीक्षक वर्षा मते यांनी माझे कडील सोनी कंपनीचे व्हाईस रेकॉर्डर मध्ये झालेले संभाषण ऐकून गैरअर्जदार संदीप दोडके यांनी माझे कामाचे धनादेशावर सही करुन देण्याकरिता स्वत: साठी तसेच रामदास चौधरी यांनी गैरअर्जदार संदीप दोडके यांचे साठी लाच रक्कम स्वीकारण्याची तयारी दर्शविल्याची खात्री केली.

त्यानंतर मला ०४ ते ०५ दिवस अत्यंत महत्वाचे काम असल्याने मी सापळा कार्यवाही दिनांक १२/०९/२०२३ रोजी करण्याची सापळा अधिकारी यांना विनंती केली. ठरल्याप्रमाणे दिनांक १२/०९/२०२३ रोजी सापळा पथक व पंच हे १०.१५ वाजता मला मांगरुळ फाटा येथे येवुन भेटले. तेव्हा मी पंचासमक्ष सापळा पथकास सांगीतले की, दिनांक ११/०९/२०२३ रोजी माझे गैरअर्जदार संदीप दोडके यांचेशी फोनवर बोलणे झाले असुन ते मला आज रोजी चिमुर जि. चंद्रपुर येथे भेटणार आहे. गैरअर्जदार भेटण्याकरिता चिमुर येथे आल्यानंतर मला फोन करणार आहे असे मी पोलीस निरीक्षक वर्षा मते यांना सांगीतले. त्यावरुन सापळा कार्यवाही चिमुर येथुन करण्याचे सर्वानुमते ठरवुन मी, सापळा पथक व पंच असे आम्ही आंबेनेरी फाटा येथुन १०.३५ वाजता निघुन ११.३० वाजता चिमुर येथील बालाजी मंदीर परिसरात आलो. तेथे पोलीस निरीक्षक वर्षा मते यांनी सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. तसेच गैरअर्जदार यांनी स्वत: किंवा इतर व्यक्तीचे मार्फतीने लाच रक्कम स्विकारल्यानंतर माझे पॅन्टचे डाव्या बाजुचे खिशात ठेवलेला रूमाल काढून आपला चेहरा पुसण्याचा इशारा करण्यास मला सांगीतले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य इशारा मिळताच लाच रक्कम स्विकारणाऱ्यास रंगेहात पकडतील असे सांगीतले त्यानंतर पंच क्र. १ यांचे हस्ते माझी अंगझडती घेवुन अंगझडती यादी तयार करण्यात आली.

त्यानंतर पोलीस निरीक्षक वर्षा मते यांनी पंचासमक्ष बालाजी मंदीर परिसरात सापळा रचण्यात येणार असल्याचे सांगुन सापळा दरम्यानचे संभाषण सोनी कंपनीचे व्हाईस रेकॉर्डद्वारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर अँथ्रासीन पावडर लावलेले रू. ५०,०००/– (ज्यात रू. ५००/– दराच्या १०० चलनी नोटा) पंच क्र. १ श्री. दातखिळे यांचे समक्ष पंच क्र. २ श्री. परोडवाड यांचे हस्ते माझ्या पॅन्टचे समोरील उजव्या बाजुचे खिशात ठेवल्या. गैरअर्जदार संदीप दोडके यांची भेट घेण्याकरिता गैरअर्जदार यांचे फोनची वाट बघत बालाजी मंदीर परिसरात थांबण्यास सांगीतले. त्यानंतर वेळ १३.११ वा. पंच क्र. १ श्री. दातखिळे यांचे आवाजात व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून धाग्याच्या सहायाने माझे गळयात लटकावून मी परिधान केलेल्या शर्टाचे आत लपवुन ठेवण्यात आला व पंच क्र. १ श्री. दातखिळे यांचेसह बालाजी मंदीर परिसरात थांबुन राहीलो. यानंतर मी व पंच क्र. १ बालाजी मंदीर येथे थांबुन असता गैरअर्जदार यांचा मला फोन आला त्यांनी मला विदर्भ कोकण बॅंक, चिमुर येथे आलो असुन थोडा वेळ लागेल असे सांगीतले. त्यानंतर काही वेळाने पुन्हा गैरअर्जदार संदीप दोडके यांचा मला फोन आला त्यावेळी मी त्यांना पेट्रोल भरायला आलो आहे असे सांगुन नेरी फाटा येथे थांबुन राहीलो. तेव्हा गैरअर्जदार यांनी मला पंचायत समिती कडे येण्यास सांगीतले. मी नेरी फाटा येथुन निघुन पंचायत समिती कडे जात असता जोराचे पाउस असल्याने व समोरील रस्ता निट दिसत नसल्याने मी पेट्रोल पंपचे समोर जावुन थांबलो. गैरअर्जदार यांनी थोडया वेळाने मला पुन्हा फोन करुन ताडोबा बार येथे बोलाविले. सापळा कार्यवाही दरम्याण सापळा पथक व पंच क्र. २ हे माझे वाहनाचे पाठोपाठ काही अंतर ठेवुन सरकारी वाहनाने येत होते. मी पंच क्र. १ यांचेसह बारचे आत गेलो असता, गैरअर्जदार संदीप दोडके हा बारमधील हॉलचे मागील रुममध्ये बसलेला दिसला. मी पंच क्र. १ यांचेसोबत गैरअर्जदार बसलेल्या टेबलाचे समोर जावुन बसलो असता कामाची बोलणी सुरु केली तेव्हा गैरअर्जदार संदीप दोडके यांनी त्याचा स्वत: करीता २ टक्के प्रमाणे रुपये २६,०००/– व २०००/– भोजारा तसेच उपसरपंच हरिष गायकवाड यांचे १ टक्का प्रमाणे १३,०००/– असे एकुण ४१,०००/– लाचेची मागणी केली. मी गैरअर्जदार यास माझे खिशात असलेल्या एकुण

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील)**)**

| **S.No.**(अ.क्र.) | **Sex** (लिंग) | **Date/Year of Birth** (जन्म तारीक/ वर्ष) | **Build** (बांधा) | **Height (cms.)** (उंची(सें. मी.)) | **Complexion** (रंग) | **Identification Mark (s)** (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 3 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| **Deformities/ Peculiarities** | **Teeth** (दात) | **Hair** (केस) | **Eyes** (डोळे) | **Habit(s)** (सवयी) | **Dress Habit(s)** (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

| **Language /Dialect** (भाषा / बोलीभाषा) | **Place Of** (का स्थान) | | | | | **Others** (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | **Burn Mark** (भाजल्याच्या खुणा) | **Leucoderma** (कोड) | **Mole** (तिळ) | **Scar** (व्रण) | **Tattoo** (गोंदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)

५०,०००/— लाच रकमेपैकी रुपये ४१,०००/— गैरअर्जदार संदीप दोडके यांना दिली. व उर्वरीत रक्कम रुपये ९०००/— माझे जवळ ठेवुन घेतली. गैरअर्जदार यांनी माझे कडुन लाच रक्कम स्विकारुन त्याचे समोरील उजव्या बाजुचे खिशात ठेवली. त्यानंतर मी बारचे बाहेर येवुन सापळा पथकास मी माझे पॅन्टचे खिशात ठेवलेला रूमाल काढून आपला चेहरा पुसण्याचा लाच रक्कम स्विकारल्या बाबतचा नियोजीत इशारा वेळ १६.३० वाजता केला. त्यावेळी सापळा पथकाने गैरअर्जदार श्री. संदीप दोडके यांना रंगेहात पकडून ताब्यात घेतले. त्यानंतर पंच क्र. १ श्री. दातखिळे च्या आवाजात व्हाईस रेकॉर्डर वेळ १६.३५ वाजता बंद केला. त्यानंतर सापळा पथकातील पंच क्र. १ यांचे हस्ते गैरअर्जदार संदीप दोडके यांची अंगझडती घेण्यात आली. त्यानंतर मी सापळा पथकास सांगीतले की, गैरअर्जदार संदीप दोडके यांनी उपसरपंच यांचे करीता १ टक्का रकमेची म्हणजे १३,०००/— रुपये लाच मागणी करुन स्विकारली आहे. म्हणुन गैरअर्जदार क्र. ३ श्री. हरिष गायकवाड पद— उपसरपंच ग्राम पंचायत आंबेनेरी ता. चिमुर यांची लाचेची मागणी आहे किंवा कसे याबाबत पडताळणी करण्याकरिता सापळा पथक व पंच यांचेसह आंबेनेरी फाटा, भिसी रोड कडे जावुन पंच क्र. १ यांचे आवाजात व्हाईस रेकॉर्डर वेळ १७.२० वाजता सुरु करुन, माझे मोबाईल क्रमांक ९५५२०००६७१ यावरुन गैरअर्जदार श्री. हरिष गायकवाड उपसरपंच ग्राम पंचायत, आंबेनेरी यांचे मोबाईल क्र. ८७६७४०२५९९ यावर फोन करुन फोनचे स्पिकर सुरु ठेवुन मी त्यानंतर गैरअर्जदार दोडके यांनी उपसरपंच हरिष गायकवाड पद— उपसरपंच ग्राम पंचायत आंबेनेरी ता. चिमुर यांना तुमच्या करीता १ टक्का रकमेची मागणी करुन स्विकारली असल्याचे सांगीतले असता, गैरअर्जदार उपसरपंच श्री. हरिष गायकवाड यांनी ठिक आहे ठिक आहे असे म्हणुन लाचेबाबत सहमती दर्शविली. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर १७.२५ पंच क्र. १ यांचे आवाजात बंद करण्यात आला.

त्यानंतर आरोपी क्र. २ श्री. रामदास चौधरी पद—सरपंच ग्राम पंचायत बोरगांव बुट्टी यांना त्यांचे राहाते घरुन तसेच आरोपी क्र. ३ श्री. हरिष अंबादास गायकवाड पद—उपसरपंच ग्राम पंचायत, आंबेनेरी यांना त्यांचे राहाते घरुन पंचांसमक्ष ताब्यात घेवुन पोलीस स्टेशन, चिमुर येथे आणण्यात आले. सापळा कार्यवाही बाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक वर्षा मते यांनी पंचनामा क्र. ४ मध्ये घेतल्या आहेत.

करीता आरोपी क्र. १ श्री. संदीप सुखदेव दोडके पद—सरंपच ग्राम पंचायत आंबेनेरी ता. चिमुर व आरोपी क्र. २ श्री. रामदास परसराम चौधरी पद—सरपंच ग्राम पंचायत बोरगांव (बुट्टी) आरोपी क्र. ३ हरिष अंबादास गायकवाड पद—उपसरपंच ग्राम पंचायत, आंबेनेरी यांनी पदाचा गैरवापर करुन मी ग्राम पंचायत आंबेनेरी अंतर्गत जिल्हा परिषद शाळा, आंबेनेरी येथे पुरविलेल्या बांधकाम मटेरियलचे प्राप्त बिलाचे धनादेशावर सही करुन देण्याकरिता पंचासमक्ष मला लाचेची मागणी करुन गैरअर्जदार श्री. संदीप दोडके यांनी लाच रक्कम रुपये ४१,०००/— स्वत: स्विकारले असल्याने माझी त्यांचेविरूध्द कायदेशिर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मराठीत टंकलिखीत केली असुन, ती मला वाचुन दाखविण्यात आली. ती माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

(वर्षा मते)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नागपूर